महाराष्ट्र शासन

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,

महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई - ४०० ००१.

**क्रमांक : व्यशिप्र-२०२२/आस्था-२/प्र.क्र.२३/पदभरती/का-४** **दि. १९-०६-२०२३**

# परिपत्रक क्र.१२

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अधिपत्याखालील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील (Govt. ITI) विविध व्यवसायातील शिल्प निदेशक (Craft Instructor) (गट-क) संवर्गातील पदभरती संदर्भात दि.१७/०८/२०२२ रोजी www.dvet.gov.in या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती.

सदर जाहिरातीच्या अनुषंगाने दि.२८ व २९/०९/२०२२ रोजी झालेल्या सामायिक परीक्षेत (CBT-१) (Normalization-Mean Standard Deviation Method नुसार) किमान ४५% गुण प्राप्त करून व्यावसायिक चाचणी (CBT-२) करिता पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी विहित परीक्षा शुल्कासह व्यावसायिक चाचणी (CBT-२) करिता अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची व्यावसायिक चाचणी (CBT-२) **दिनांक ०५ ते ११/०६/२०२३ व १३/०६/२०२३** या कालावधीत घेण्यात आली. सदर व्यावसायिक चाचणी (CBT-२) ची उत्तरतालिका (Answer key) उमेदवारांच्या लॉगीन मध्ये उपलब्ध करुन देण्यांत आली आहे.

सदर उत्तरतालिका संदर्भात उमेदवारांना हरकती (objections) सादर करावयाच्या असल्यास जाहिरातीमधील अ.क्र.१५.१९ मध्ये नमूद तरतुदीनुसार उमेदवारांनी **दिनांक २०/०६/२०२३ ते २२/०६/२०२३** या कालावधीत त्यांच्या लॉगीन मधून प्रश्नांसंबंधित हरकती आवश्यक अभिलेख्यासह (alongwith documents) विहित आक्षेप हाताळणी शुल्क (विनापरतावा) (Objection handling fees - Non-refundable) अदा करुन ऑनलाईन पध्दतीने सादर कराव्यात.

विहित ऑनलाईन पध्दती व्यतिरिक्त अन्य कोणत्याही नमुन्यातील, अन्य कोणत्याही मार्गाने / पध्दतीने तसेच विहित कालावधीनंतर सादर केलेल्या हरकती कोणत्याही परिस्थितीत स्विकारल्या जाणार नाहीत. विहित कालावधीत प्राप्त झालेल्या हरकतींचीच दखल घेतली जाईल. तरी संबंधित उमेदवारांनी याची नोंद घ्यावी.

**Login Link :** https://cdn3.digialm.com//EForms/configuredHtml/32330/78392/login.html

स्वाक्षरीत/-

( दि. अं. दळवी )

संचालक,

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई-१.